**प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली**

**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (ठाणे व पालघर जिल्हा)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ९६/२०१८** **दिनांक ३०/११/२०१८** **कालावधी ५ दिवस**


**डॉ. सुभाष चव्हाण,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२२४३१०६७

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक २४/११/२०१८ ते ३०/११/२०१८) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक ०१/१२/२०१८ सकाळी ८:३० पासून ०५/१२/२०१८ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २४/११ | २५/११ | २६/११ | २७/११ | २८/११ | २९/११ | ३०/११ | | ०१/११ | ०२/११ | ०३/११ | ०४/१२ | ०५/१२ |
| ० | ० | ० | ० | ० | ० | ० | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| ३३.४ | ३३.६ | ३३.२ | ३३.२ | ३४.८ | ३३.२ | ३४.२ | कमाल तापमान (अं.से) | ३४ | ३४ | ३३ | ३३ | ३३ |
| १९.४ | १९.२ | १८.० | १७.२ | १७.४ | १७.४ | - | किमान तापमान (अं.से) | २० | १९ | १९ | १९ | १८ |
| ० | ० | ० | ० | ० | ० | ० | मेघाच्छादन (ऑक्टा) | ४ | ७ | ७ | ६ | ७ |
| ८७ | ८९ | ८१ | ८१ | ८० | ८७ | ७४ | काळची सापेक्ष आर्द्रता | ६४ | ५४ | ६४ | ६५ | ६५ |
| ३९ | ४४ | २९ | ३४ | ३६ | २८ | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ५१ | ५२ | ५२ | ५२ | ५३ |
| २.५ | २.१ | १.७ | २.३ | २.२ | २.६ | ३.१ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ६ | ५ | ५६ | ६ | ९ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याची दिशा | पू. | पू. | पू. | पू. | पू. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०१८ पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ०.० | २३५९.६ | २८३४.२ |

**हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला**

**दिनांक १ ते ५ डिसेंबर २०१८ पर्यंत आकाश मेघाच्छादित राहील.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| भात | पेरणी | • उन्हाळी भात रोपवाटीकेतील पेरणी पूर्ण करून घ्यावी. |
| भुईमुग | पेरणी | • कमी होणाऱ्या तापमानाचा भुईमुगाच्या उगवणशक्तीवर परिणाम होत असल्याने पारदर्शक प्लास्टिक आच्छादन (५ ते ६ मायक्रोन) वापरून भुईमुगाची लागवड करावी. आच्छादनावर २० सेमी अंतरावर तीन ओळीमध्ये १० सेमी अंतरावर ३ सेंमी व्यासाची भोके पाडावीत. आच्छादनासाठी गादीवाफे तयार करताना ६० सेंमी रुंदीचे व ५-७ सेंमी उंची असलेले तयार करावेत. दोन गादीवाफ्यामधील अंतर ३० सेंमी ठेवावे. भुईमुगातील तणांच्या नियंत्रणासाठी हेक्टरी १.५ किलो ब्युटाक्लोर ५ मि.ली. प्रती १० लिटर पाण्यात मिसळून गादीवाफ्यावर पेरणीपूर्वी ओल्या पृष्ठभागावर एकसारखी फवारणी करावी. तणनाशक फवारणीनंतर प्लास्टिक आच्छादन गादीवाफ्यावर अंथरावे व कडांवर मातीचा थर दयावा. आच्छादनावर पाडलेल्या भोकात ३-४ सेंमी खोलीवर बियाण्याची पेरणी करावी. हेक्टरी १०९ किलो युरिया व ६२५ किलो सिंगल सुपर फोस्फेट या खताची संपूर्ण मात्रा पेरणीपूर्वी ओळीमध्ये ८-१० सेंमी खोलीवर पडेल अशा तऱ्हेने दयावी. टि ठीबक सिंचनाची सोय करता येणे शक्य असल्यास आच्छादन अंथरण्यापूर्वी ठीबक सिंचनाचा संच अंथरावा. |
| भाजीपाला/ फळबाग रोपवाटिका | पुर्नलागवड | • टोमेटो, वांगी, मिरची पिकांमध्ये पाने खाणारी अळी, तांबडे भुंगे, तुडतुडे, मावा किडींचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी मॅलेथीऑन २० मिली किंवा डायमेथोएट १५ मिली १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>• फळबाग रोपवाटीकेस नियमित पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| फुल पिके | पुर्नलागवड | • अस्टर पिकाची रोपे लागवडीयोग्य झाली असल्यास पुर्नलागवड करावी. लागवड सरीवरंब्यावर ३० x ३० सेंमी किंवा ३० x ६० सेंमी अंतरावर करावी. नांगरणीच्या वेळेस जमिनीत हेक्टरी २५ टन शेणखत मिसळावे. लागवडीच्या वेळेस प्रती हेक्टरी १९५ किलो युरिया, ६२५ किलो सिंगल सुपर फोस्फेट आणि १६६ किलो म्युरेट ऑफ पोटश खताची मात्र द्यावी. लागवडीनंतर लगेच पाणी द्यावे. |
| दुभती जनावरे/ शेळ्या/ कुकुटपालन | - | • जनावरांना हिरव्या चाऱ्यासाठी चारा चवळी, मका या पिकांची लागवड करावी.<br>• जनावरांसाठी लिव्हर फ्ल्यू रोगावर प्रतिबंधात्मक उपाय म्हणून पशु वैद्यकिय अधिकारी सल्ल्याने सर्व जनावरांना जंताचे औषध द्यावे.<br>• रात्रीच्यावेळी किमान तापमानात घट होत असल्याने जनावरांच्या गोठयात तसेच कोंबड्यांच्या शेड मध्ये गरजेनुसार विजेचे बल्ब आणि शेडभोवती पडदे गुंडाळावे. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा.**